31-03-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/30/2025 10:11 PM Page 1



# रावण सत्तरीत 'ग्रामीण साहित्य संमेलन'चे उद्घाटन

## 'कळस' स्मारणिकेचे प्रकाशन | ज्येष्ठ लोककलाकार जानकी गावस यांना पहिला ग्रामभूषण पुरस्कार

■ टीम दैनिक हेराल्ड



**केरी, दि. ३०** : साहित्य मंथन सत्तरी आणि श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थान रावण सत्तरी यांच्या संयुक्त विद्यमाने चौथ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे उद्घाटन आज मोठया थाटात झाले. रावण सत्तरी येथील श्री सातेरी केळबाय देवस्थान प्रांगणात या संमेलनाला सुरुवात झाली. दोन दिवस हे संमेलन चालणार असून त्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनाचे उदघाटन ज्येष्ठ साहित्यिक आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते दामोदर मावजो यांच्या हस्ते झाले. यावेळी केंद्रिय साहित्य पुरस्कार विजेते साहित्यिक प्रविण बांदेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच यावेळी संमेलनाध्यक्ष लोकवेद अभ्यासक कमलाकर म्हाळशी, केरी जिल्हा पंचायत सदस्य देवयानी गावस, केरी ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया गावस, साहित्य मंथनाचे अध्यक्ष काशिनाथ नाईक, संमेलनाचे कार्याध्यक्ष गणेश शेटकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष सत्यवान गावस आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पटकळणीच्या रोपाला पाणी घालून आणि पारंपरिक माले प्रज्वलीत करून संमेलनाचे उदघाटन करण्यात आले. तसेच यावेळी साहित्य संमेलनासंबंधी 'कळस' या स्मारणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कमलाकर म्हाळशी, देवयानी गावस आणि सुप्रिया गावस आपले यांनी आपले मते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक काशिनाथ नाईक, सूत्रसंचालन गोपीनाथ गावस तर राजू बर्वे यांनी आभार मानले.

लोककलाकार जानकी रामा गावस यांना पहिला ग्रामभूषण पुरस्काराने सन्मानीत

दरम्यान या उद्घाटन कार्यक्रमावेळी ज्येष्ठ लोककलाकार जानकी गावस यांना पहिला ग्रामभूषण पुरस्कार साहित्यिक प्रविण बांदेकर यांच्या हस्ते देऊन त्यांना गौरवण्यात आले. यावेळी जानकी गावस याबाबत कृतज्ञता व्यक्त केली आणि लोककलेची काही गीते गाऊन दाखवली. ९० वर्षीय जानकी गावस यांनी आपल्या पूर्ण आयुष्यात फुगडी, धालो गीते, जती– सोकारती आदी लोक साहित्याचे संवर्धन करीत त्याचा प्रसार पुढील पिढीपर्यंत करण्याचे मोठे कार्य केलेले आहे.

दामोदर मावजो यांनी ग्रामीण साहित्यातून ग्रामीण भागातील वंचित, उपेक्षित आणि कष्टकरी समाजाचे जीवन त्यांच्या समस्या आणि दुःख याचे दर्शन यायला हवे. ग्रामीण साहित्य हे तिथल्या वंचितांचा आवाज व्हायला हवी तशीच ती प्रागतिक विचारांची संमेलने व्हावी आणि त्यातून समतावादी विचार समोर यायला हवे अशी अपेक्षा व्यक्त केली. साहित्य मंथन राबवत असलेल्या उपक्रमांची त्यांनी स्तुती केली तसेच संमेलनासाठी रावण गावातील लोकांची मेहनतीचे कौतुक केले.

प्रवीण बांदेकर यांनी भाषेच्या नावाने वाद करण्यापेक्षा साहित्यिकांनी देशाच्या समस्या आपल्या साहित्यातून मांडव्या असे मत व्यक्त केले. माझी मातृभाषा मराठी आहे तरीपण कोकणीतील बरेच साहित्य वाचलेले आहे. मला जशी मराठी भाषा प्रिय तशी कोकणी भाषाही आवडते. भाषा ही आपल्याला व्यक्त होण्याचे माध्यम असून त्यातून आपण वंचित – उपेक्षित समाजाचे दुःख – वेदना मांडव्यात नपेक्षा त्याच्यावरून वाद करू नये असे मत केले.



पेडणे : सत्कामूर्तीसमवेत राजमोहन शेटये, मुख्याध्यापिका सरिता महाले, मुख्याध्यापिका विधीला परब, ईशा परुळेकर, जानवी गावकर, अंजली गावकर व निशा हळदणकर.

# व्हायकाउंट हायस्कूलच्या शाळा समूहाच्या स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ३०** : पेडणे येथील व्हायकाऊंट हायस्कूल शाळा समूहाच्या स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. सरकारी प्राथमिक विद्यालय पोरस्कडे येथे या स्पर्धा घेण्यात आल्या. या शाळा समूहात स. प्रा. वि. भाटपावणी, स. प्रा. वि. पोरस्कडे व व्हायकाऊंट ऑफ पेडणे प्रायमरी स्कूल यांचा समावेश आहे. दरवर्षी या समूहाच्या माध्यमातून विविध अशा अंतर्गत स्पर्धा घेण्यात येतात. याच अनुषंगाने यावर्षी पहिली ते दुसरीच्या विद्यार्थ्यांना चित्रकला स्पर्धा तर तिसरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांना नृत्य स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने व्हायकाऊंट ऑफ पेडणे प्रायमरी स्कूलचे प्रभारी श्री राजमोहन शेटये, स. प्रा. वि. भाटपावणी च्या मुख्याध्यापिका सरिता महाले, स. प्रा. वि. पोरस्कडे च्या मुख्याध्यापिका विधीला परब, व्हायकाउंट हायस्कूल शाळा समूहाच्या कार्यक्रम प्रभारी शिक्षिका ईशा परुळेकर, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष सौ जानवी गावकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अंजली गावकर, पंच सदस्य निशा हळदणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पोरस्कडेच्या मुख्याध्यापिका विधीला परब या निवृत्त होत असल्याने समूहाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजमोहन शेटये यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की शिक्षक हा कधीच निवृत्त होत नाही, आपल्या समर्पक अशा योगदान ने तो कायम क्रियाशील राहतो. घडविलेले विद्यार्थी हा त्यांचा वारसा पुढे नेत जातात व ज्ञान वृद्धिंगत होते. मुलांच्या जडणघडणीत प्राथमिक पाया हा फार महत्त्वाचा असतो आणि तोच मजबूत करताना प्राथमिक स्तरावरच्या शिक्षकांचा कस लागतो. उभ्या आयुष्यात मुख्याध्यापिका परब हीच योगदान या शाळेच्या जडणघडणीत कायम आठवणीत राहील. यावेळी शिक्षिका परब हिने आपले मनोगत व्यक्त केले. हा सत्कार आपल्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा क्षण असा मानून जीवन सार्थकी लागले असे उद्गार तिने काढले. आपण या समूहाची जोडलेलं नातं कायम जीवनाच्या कप्प्यात आठवणीत ठेवेन. या संपूर्ण कार्यक्रमास पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळा समूहाच्या प्रभारी शिक्षिका ईशा परुळेकर हिने केले. व शेवटी आभारही तिनेच मानले.

# 'तालयात्रा' कार्यक्रमत रसिक मंत्रमुग्ध

■ टीम दैनिक हेराल्ड




**पणजी, दि. ३०** : शास्त्रीय गायन, कथ्यक नृत्यासह तबला, पखवाज, ड्रम वाद्यांच्या आविष्कारातून ताल आणि लयीची विलक्षण पेशकश करून रसिकांना नादब्रह्माच्या आगळ्या विश्वात रममाण करणारी 'तालयात्रा' म्हणजे रसिकांसाठी रविवारी लाभलेली पर्वणीच होती. थोर तबला गुरु तालयोगी पद्मश्री पंडित सुरेश तळवकर यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही तालयात्रा विश्वविख्यात तबलानवाज पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांना आदरांजली वाहण्यासाठी स्वस्तिक कल्चरल असोसिएशनने रविवारी सकाळी कला अकादमीच्या मास्टर दीनानाथ मंगेशकर कला मंदिरात आयोजित केली होती. तालयात्रेने झाकीरभाईंचा आत्मा नक्कीच सुखावला असेल. पंडित सुरेशजींच्या कुशल मार्गदर्शनाखाली त्यांच्या शिष्यांनी केलेले सादरीकरण रसिकांना मनमुराद आनंद देऊन गेले.

तोडी रागातील झपतालात निबद्ध बंदिशीने सुरुझालेल्या या तालयात्रेत तबल्यावर पुष्कर भागवत व सावनी तळवलकर (पंडितजींची कन्या), पखवाजवर कृष्णा साळुंके, काजोन वर ईशान परांजपे, तसेच ड्रमस, हार्मोनियम व व्हायोलिनवर ऋतुराज हिंगे, अभिषेक भुरूक , आशय कुलकर्णी यांनी आपल्या प्रभावी अदाकारीने रंग भरला. नागेश आडगावकर व विनय रामदासन यांनी गायिलेल्या रचना आणि पंडित सुरेशजी यांची पढंत ऐकणे वेगळा आनंद होता. भटियार मधील बंदिशीवर लय – तालाची तर उधळण लाजवाब होती. राग ललत मधील पंडित शंकर अभ्यंकर यांची सदा रंग अदा रंग तन रंग मन रंग.. ही तिनताल मधील ललत रागातील बंदिश आणि त्याचे लय तालाशी खेळत केलेले सादरीकरण म्हणजे उस्फूर्त आविष्कार. निखिल परिहार यांच्या कथ्यक नृत्याविष्कारात पदन्यासातील लालित्य व लयकारीचा अंदाज लक्षवेधी होता. कृष्णा साळुंके यांनी पखवाज सोलो वादनात हनुमान परण, गणेश परण, दो हाती परण, दुर्गा परण, विठ्ठल परण (स्वरचित). अशा रचना सफाईदारपणे व दमदारपणे वाजवून वातावरण भारून टाकले. खमाज रागातील द्रुत तिनताल मधील रचनेने तालयात्रेची सांगता झाली आणि रसिक तृप्त मनाने परतले. समई प्रज्वलित करून व उस्ताद झाकीर हुसेन यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून , पंडित सुरेश तळवकर, पी.के.मुखर्जी, विनयकुमार मंत्रवादी, स्वस्तिक चे अध्यक्ष डॉ.प्रविण गावकर यांनी कार्यक्रमाला प्रारंभ केला. पंडित सुरेश तळवकर यांनी यावेळी उस्ताद झाकीरभाईंच्या आठवणीना उजाळा दिला. यावेळी पंडित तळवकर यांचा सत्कार करण्यात आला.

# 'रोरो फेरी'चे स्वप्न लवकरच साकारणार

▶ अर्थसंकल्पात मये मतदारसंघासाठी भरीव योजना : आमदार प्रेमेंद्र शेट यांची माहिती

■ टीम दैनिक हेराल्ड



**डिचोली, दि. ३०** : चोडण – रायबंदर मार्गावर लवकरच 'रोरो फेरी' सुरू करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारणार असून त्यासाठीच्या धक्का बनवण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. इंजिनही दाखल झाले असून आगामी दोन महिन्यात काम पूर्ण होऊन प्रत्यक्षात रोरो फेरी मार्गावर येणार असल्याची माहिती आमदार प्रेमेंद्र शेट यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सादर केलेला अर्थसंकल्प मये मतदार संघासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहेः.

शिरगाव येथील देवस्थानच्या जत्रोत्सवास राज्योत्सव म्हणून दिलेली मान्यता. अमृत सरोवर अंतर्गत नार्वे तीर्थावर दहा कोटींचा प्रकल्प अंतर्गत गोमंत सरिता दर्शन गंगा आरती घाट उभारण्याचा संकल्प तसेच विविध आधी भागात शैक्षणिक व पर्यटन विकासासाठी बरी विशेष तरतूद मूलभूत व पायाभूत सुविधांसाठी आर्थिक सहकार्य यामुळे अर्थसंकल्पात महत्व पूर्ण घोषणा केलेली असून या ठिकाणी रेल्वे स्टेशनही साकारण्या येणार आहे त्यामुळे मतदारसंघाचा कायापालट होण्यास मदत होणार असल्याचे प्रेमेंद्र शेट यांनी सांगितले.

यावेळी प्रेमानंद म्हाबरे यांनी अर्थ संकल्पच्या जमेच्या बाजू सांगितल्या. यावेळी उत्तर गोवा भाजप अध्यक्ष दयानंद कारबोटकर, मंडळ अध्यक्ष संदीप पार्सेकर, जिल्हा अध्यक्ष शंकर चोडणकर, विश्वास चोडणकर, कमलाकांत वाडयेकर, शिवाजी जल्मी आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## स्मार्ट सीटी कामांच्या विलंबामुळे नागरिक त्रस्त

२०१५ मध्ये सुरू झालेल्या स्मार्ट सिटी मोहिमेचे उद्दिष्ट १०० स्मार्ट शहरे विकसित करण्याचे होते. २०१६–२०१८ दरम्यान स्पर्धात्मक निवडीअंतर्गत शहरांची निवड करून, त्यासाठी पाच वर्षांची मुदत देण्यात आली होती. मात्र, कामे वेळेत पूर्ण न झाल्यामुळे केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने २०२१ मध्ये मुदतवाढ दिली, जी २०२३ पर्यंत वाढवण्यात आली. नंतर ती ३० जून २०२४ आणि आता ३१ मार्च २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या निवेदनानुसार, उर्वरित १0% प्रकल्प पूर्ण करण्यासाठी काही राज्ये आणि शहर सरकारकडून मुदतवाढीसाठी विनंत्या करण्यात आल्या होत्या. नागरिकांच्या हितासाठी हे प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक असल्याने केंद्र सरकारने मिशनची मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत वाढवली आहे.

इमॅजिन पणजी ने अद्याप प्रकल्पांच्या प्रगतीबाबत कोणतीही अधिकृत माहिती दिली नसली, तरी फेब्रुवारी २०२४ मध्ये दिलेल्या माहितीनुसार, मध्य पणजीतील ३,४०० मीटर रस्ते पूर्ण झाले आहेत, तर ३,४५० मीटरचे काम अद्याप प्रलंबित आहे.इमॅजिन पणजी ला ४ मार्च २०२५ पर्यंत स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत ४४१ कोटी रुपयांची केंद्रीय मदत मंजूर करण्यात आली आहे, त्यापैकी ४११ कोटी रुपये वापरण्यात आले आहेत. एकूण १,०५१ कोटी रुपयांचे ५१ प्रकल्प हाती घेतले असून, ८४९ कोटी रुपयांचे ४२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उर्वरित २०२ कोटी रुपयांचे ९ प्रकल्प अद्याप सुरू आहेत.

---

## लिथियमसाठी युक्रेन–अमेरिका खनिज करार होणार ?

लिथियम–आयन बॅटरी उत्पादन क्षमतेच्या बाबतीत चीन सध्या ७५ टक्के बाजारावर वर्चस्व राखत आहे. त्यामुळे अमेरिकेला युक्रेनसारख्या देशांमध्ये लिथियम आणि इतर दुर्मिळ खनिजांसाठी करार करण्याची आवश्यकता आहे, असे विश्लेषकांचे मत आहे.

सोव्हिएत युनियनच्या काळात युक्रेनमध्ये पोलोखिव्हस्के, डोब्रा आणि क्रुता बाल्का येथे लिथियमचे मोठे साठे असल्याचे नोंदवले गेले होते. मात्र, युद्धाच्या पार्श्वभूमीवर या क्षेत्रांमध्ये उत्खनन करणे मोठे आव्हान आहे. मात्र अनेक भूवैज्ञानिकांच्या मते या खनिज साठ्यांबाबतची उपलब्ध माहिती कितपत विश्वासार्ह आहे, हे स्पष्ट नाही.

अमेरिकन सरकारने देशांतर्गत लिथियम उत्पादन वाढवण्यासाठी खाण कंपन्यांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे. जो बिडेन यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात महागाई कमी करण्याच्या कायद्यांतर्गत खाण कंपन्यांना मोठ्या प्रमाणात कर्ज दिले जात आहे. तथापि, नवीन खाणी उघडण्यास आणि उत्पादन प्रक्रियेत मोठा वेळ आणि गुंतवणूक लागते. तसेच, लिथियमच्या किमतीत मोठ्या प्रमाणात घट झाल्याने (२०२२ च्या तुलनेत ८० टक्के घसरण) कंपन्यांनी नवीन खाण प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीबाबत सावध भूमिका घेतली आहे. युक्रेनच्या खनिज साठ्यांवर अमेरिकेच्या प्रवेशामुळे जागतिक राजकीय आणि आर्थिक समीकरणांमध्ये मोठे बदल घडू शकतात. परंतु, युद्धजन्य परिस्थिती आणि गुंतवणुकीच्या जोखमीमुळे या कराराच्या यशस्वितेवर साशंकता व्यक्त केली जात आहे. पुढील काही वर्षांत लिथियमच्या बाजारपेठेतील स्थिती आणि राजकीय घडामोडी या कराराच्या भविष्यासाठी निर्णायक ठरणार आहेत.

---

## कोमुनिदाद संस्थांमध्ये सरकारी हस्तक्षेप वाढणार

या दुरुस्तीच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर कोमुनिदाद प्रशासकाने एक निर्देश जारी केला आहे. या निर्देशानुसार, संहितेच्या कलम ४७ अंतर्गत वेळेत व्यवस्थापकीय समित्या निवडण्यात अपयशी ठरलेल्या कोमुनिदाद संस्थांची यादी तयार करण्यास सांगण्यात आले आहे.

माध्यमांच्या प्रश्नांना उत्तर देताना, प्रशासक बर्वे यांनी स्पष्ट केले की, सुधारित कलम १८१–अ नुसार ज्या समुदायांमध्ये निवडणुका झालेल्या नाहीत, त्यांची सविस्तर माहिती गोळा करून सरकारकडे सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यांनी स्पष्ट केले की, प्रशासकांची भूमिका फक्त अहवाल सादर करण्यापुरती मर्यादित असेल, तर या संस्थांबाबतचा अंतिम निर्णय सरकारकडून घेतला जाईल.

सध्या दक्षिण गोव्यातील ९० कोमुनिदाद संस्थांपैकी जवळपास एक तृतीयांश संस्थांनी अद्याप निवडणुका घेतलेल्या नाहीत. यामध्ये २० संस्था साष्टी तालुक्यात, सहा मोरमुगावमध्ये, तीन केपे मध्ये आणि एक सांगे येथे आहे. या पार्श्वभूमीवर, काही सामाजिक नेत्यांनी सरकारच्या या निर्णयामुळे संस्थांच्या पारंपरिक स्वायत्ततेवर परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली आहे. सरकारी नियुक्त संरक्षकांच्या वाढत्या भूमिकेमुळे संस्थांचे स्वायत्त प्रशासन धोक्यात येण्याची शक्यता असल्याचे नेत्यांचे म्हणणे आहे.कोमुनिदाद नेत्यांनी राज्य सरकारला आवाहन केले आहे की, कोणताही सरकारी हस्तक्षेप करण्याआधी स्थानिक पातळीवर सर्व पर्यायांचा विचार करावा.

सुधारित कलम १८१–अ अंतर्गत, राज्य सरकार निवडणुका घेण्यात अपयशी ठरलेल्या कोमुनिदाद संस्थांसाठी संरक्षक म्हणून मामलतदार किंवा संयुक्त मामलतदार यांची नियुक्ती करू शकते. नियुक्त संरक्षक व्यवस्थापन समितीच्या अधिकारांचा त्रिवार्षिक कार्यकाळासाठी स्वीकार करतो. तथापि, संबंधित कोमुनिदाद सदस्य प्रशासकांकडे घेतलेल्या निर्णयांविरोधात अपील करू शकतात. संरक्षकाने घेतलेले कोणतेही निर्णय सरकारच्या मंजुरीशिवाय अमलात आणता येणार नाहीत आणि सरकारला एका वर्षाच्या आत अशा निर्णयांचा आढावा घेण्याचा अधिकार असेल.

# सरस्वती विद्यालयाचे बक्षीस वितरण उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड




कवळे : मार्गदर्शन करताना डॉ. अशोक प्रियोळकर. बाजूस उदय कवळेकर, विद्या रामनाथकर, सुदेश पारोडकर, माधवी कपिलेश्वरकर व गौरिश नाईक.

**सावईवेरे, दि. ३०** : कवळे येथील श्री सरस्वती पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक बक्षीस वितरण सोहळा विद्यालयाच्या सभागृहात उत्साहात झाला.

या सोहळ्यास व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ञ तथा समाजसेवक डॉ. अशोक प्रियोळकर उपस्थित होते. याशिवाय संस्थेचे उपाध्यक्ष उदय कवळेकर, शाळेच्या व्यवस्थापिका विद्या रामनाथकर, हायस्कूलचे मुख्याध्यापक सुदेश पारोडकर, मुख्याध्यापिका माधवी कपिलेश्वरकर, पालक – शिक्षक संघाचे अध्यक्ष गौरिश नाईक उपस्थित होते.

डॉ. अशोक प्रियोळकर म्हणाले की, नम्रता हा खरा दागिना असल्याने नम्रतेबरोबरच संस्कार व शिस्त विद्यार्थ्यांच्या अंगी असणे आवश्यक आहे. प्रयत्न, मेहनत, शिस्त हेच यशाचे रहस्य असून विद्यार्थ्यांनी अविरतपणे वाचनही केले पाहिजे. या शाळेतील विद्यार्थीच सूत्रनिवेदन व इतर सूत्रे हाताळत असल्याने त्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. यावेळी विद्या रामनाथकर यांनीही विचार मांडले.

सर्वप्रथम चौथीच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. मुख्याध्यापिका माधवी कपिलेश्वरकर यांनी स्वागत केले. गीतेश वेरेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. कु.मन्विक गावडे , सृष्टी कवळेकर, श्रव्या सावंत, ओंकार नाईक, संजना प्रभू, नव्या नाईक व श्रेया शेलार या विद्यार्थ्यांनी बक्षिसांची यादी सादर केली.यावेळी एप्रिल २०२४ च्या प्रज्ञाशोध परीक्षेत सुयश मिळविलेले आरव नाईक, प्रमेश्वर जस्वाल, देवंश गावडे, सानिका फडते, समर्थ गावणेकर, मनीत फडते व भुमिका राऊत या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच फोंडा तालुका व अखिल गोवा पातळीवर बक्षिसे मिळविलेली दित्या नाईक, अवनी गावडे, संजना प्रभू, आर्या माणगांवकर, मिष्टि नाईक, श्रीतेज नाईक, तनुश्री सावंत व विवान कामत अशा एकूण १५ विद्यार्थ्यांचा डॉ. प्रियोळकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्या माणगांवकर हिने केले. तर शेवटी आरोही नाईक हिने आभार मानले.

# आपल्या गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करा

## माजी केंद्रीय मंत्री रमाकांत खलप : शहिद रामसींग मेमोरियल सरकारी हायस्कूलमध्ये सन्मान सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड




पेडणे : कार्यक्रमात बोलताना माजी केंद्रीयमंत्री ॲड रमाकांत खलप,,नारायण महाले, ज. रेडकर व इतर.

**पेडणे, दि. ३०** : आपल्या गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पन्नास–पंचावन्न वर्षांपूर्वीचे विद्यार्थी एकत्र येतात आणि आपल्या एकेकाळच्या आवडत्या शिक्षकाचा भव्य सन्मान सोहळा आयोजित करतात, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. कारण हे सर्व विद्यार्थी आता साठीच्या पलिकडे गेलेले असले तरीही, आपल्या शिक्षकांनी दिलेल्या संस्कारांना ते विसरलेले नाहीत. हे दृश्य अतिशय प्रेरणादायी असून, असे भाग्य क्वचितच एखाद्या शिक्षकाच्या वाट्याला येते, असे उद्गार माजी केंद्रीय कायदामंत्री रमाकांत उर्फ भाई खलप यांनी काढले.

शहिद रामसींग मेमोरियल सरकारी हायस्कूल तोरसे हायस्कूलचे माजी शिक्षक आणि मुख्याध्यापक ज. अ. रेडकर यांच्या माजी विद्यार्थी मंडळाच्यावतीने आयोजित सन्मान सोहळ्यात काढले. कै. मा. शिवराम मोपकर सभागृह, मोप–पेडणे येथे हा भावपूर्ण सोहळा पार पडला.

व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय कायदामंत्री रमाकांत उर्फ भाई खलप, उत्सवमूर्ती ज. अ. रेडकर, माजी जिल्हा पंचायत सदस्य सूर्यकांत तोरस्कर, तोरसे गावच्या सरपंच छाया वसंत शेट्ये, उपसरपंच विजय तोरसकर, तांबोसे, मोप व उगवे पंचायतीचे सरपंच सुबोध महाले, शिक्षणतज्ज्ञ आणि लेखिका गीता सोमण, ज्येष्ठ विद्यार्थी जनार्दन परब, दशरथ परब, श्रीकांत पाटील आणि प्रा. नारायण महाले यांसह अनेक मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रारंभी, सर्व मान्यवरांचे श्री. विजय महाले यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संगीत शिक्षक श्री. नाना आसोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गुरूकृपा संगीत संस्थेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. यानंतर माननीय भूतपूर्व केंद्रीय कायदामंत्री रमाकांत खलप यांच्या हस्ते ज. अ. रेडकर सरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, भेटवस्तू आणि मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

अभय सामंत यांनी खास स्फूर्तीगीत तयार करून पाठविले होते. शहिद रामसींग मेमोरियल सरकारी हायस्कूल तोरसे

या प्रसंगी प्रा. नारायण महाले रचित मानपत्राचे वाचन खास मुंबईहून या सोहळ्यास उपस्थित राहिलेल्या सरऽच्या माजी विद्यार्थीनी श्रीमती भारती सामंत नाईक यांनी केले. त्यानंतर, स्नेहा ज. रेडकर यांची लता पाटील, प्रेमा उगवेकर, क्रांती मोपकर, अंजनी शेट्ये नाईक, सुमेधा नाईक आणि देवयानी तोरस्कर या सौभाग्यवतीनी ओटी भरून सन्मान करण्यात आला. सरांच्या बहुतेक विद्यार्थी–विद्यार्थीनीउपस्थित होत्या.

कार्यक्रमात माजी जिल्हा पंचायत सदस्य सूर्यकांत तोरस्कर, सरपंच छाया शेट्ये, उपसरपंच विजय तोरसकर, गीता सोमण, निवृत्त वायुसेना अधिकारी रामदास महाले, नौदल अधिकारी अनिल बोंद्रे, निवृत्त सैनिक राजाराम महाले, ज्येष्ठ विद्यार्थी जनार्दन परब आणि दशरथ परब यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. या सोहळ्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूविषयीच्या आठवणींना उजाळा दिला आणि आपल्या शिक्षकानी केलेल्या शैक्षणिक आणि नैतिक संस्कारांचे कौतुक केले.

या प्रसंगी कला शिक्षक आणि नाट्यदिग्दर्शक एकनाथ महाले यांनी परिश्रमपूर्वक सजविलेल्या 'स्नेह सुगंध' या स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले.मधूकर गवंडी, नारायण महाले, अमर आसोलकर, श्रीकांत पाटील, धोंडू परब, रामदास महाले, सुरेश उगवेकर, आनंद नाईक, दशरथ परब, नवनाथ तोरस्कार, श्रीकांत पाटील, श्रीकांत परब यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण महाले आणि डव्होकेट भालचंद्र मयेकर यांनी केले तर श्री. सूर्यकांत तोरस्कर यांनी आभार प्रदर्शन केले. हा हृदयस्पर्शी सोहळ्याची सांगता चहापानाने झाली.